12 AUG 2024
पुढारी



कोल्हापूर : विनया गोरे लिखित पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत विनया गोरे, वर्षा नाडगोंडे, कौस्तुभ नाडगोंडे. (छाया : नाज ट्रेनर)

# माणूस, समाजाने स्वत:चा आत्मा शोधण्याचा प्रयत्न करावा

## ज्ञानेश्वर मुळे; विनया गोरे लिखित पुस्तकांचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धकाधकीच्या जीवनात आपण आत्मा गमावून बसलो आहोत. त्यामुळे माणूस व समाजाने स्वत:चा आत्मा शोधण्याचा प्रयत्न करावा. मानवी जीवन, घटना व अनेक प्रसंगांची नाळ पुस्तकात जोडली आहे, असे प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

विनया गोरे लिखित 'फाईडिंग माय कोर' या इंग्रजी व 'विनया गोरे ते विनया गोर' या मराठी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कुलगुरू शिर्के म्हणाले, दोन्ही पुस्तकांत जीवनातील अनेक प्रसंग, संघर्ष वाचकांना खिळवून ठेवणारा आहे. लेखिका विनया गोरे म्हणाल्या, पुस्तकातून वाचकांना सकारात्मक ऊर्जा मिळेल. डॉ. तारा भवाळकर यांनी व्हीसीद्वारे संदेश वाचून दाखविला. माहेश्वरी गोखले यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा नाडगोंडे यांनी आभार मानले. यावेळी कौस्तुभ नाडगोंडे, प्रभाकर भोसले, वसंत लिमये, प्रमोद गोवंडे, डॉ. दिलीप पटवर्धन आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 AUG 2024
सकाळ

# विविध देशांतील अनुभव कथन माहितीपूर्ण

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : 'फायडिंग माय कोर', 'विनया गोरे ते विनया गोर'चे प्रकाशन

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर ,ता. ११ : 'विनया गोरे यांनी लिहिलेल्या पुस्तकात विविध देशांतील अनुभव कथन माहितीपूर्ण आहे. शब्द रचना ओघवती आहे. विविध घटना प्रसंगाचे वर्णन वाचनीय आहे. त्यामुळे वाचकांना नवे काही वाचल्याचे समाधान लाभेल,' असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी आज येथे व्यक्त केला.



कोल्हापूर : .येथील राम गणेश गडकरी सभागृहात विनया गोरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव ज्ञानेश्वर मुळे, वर्षा नाडगोंडे, लेखिका विनया गोरे आदी.

गोरे यांच्या 'फायडिंग माय कोर' या इंग्रजी तर 'विनया गोरे ते विनया गोर' या मराठी पुस्तकांचे प्रकाशन मुळे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. डॉ. मुळे म्हणाले, 'श्रीमती गोरे यांनी मानवी भावना, सामाजिक घटना, व्यक्तीगत अनुभव यांचा सुरेख संगम साधत पुस्तकांचे लेखन केले आहे. परदेशातील सामाजिक व्यवहारांच्या पद्धतीची ओळख पुस्तकातून होते.'

डॉ. शिर्के म्हणाले, 'दोन्ही पुस्तकांतील लेखन अनुवभावर आधारित आहे. देश-विदेशात गोरे यांनाही संघर्ष अनुभवावा लागला. ज्ञान, संयम व कौशल्याच्या बळावर संघर्षावर मात केली, त्याचे विविध प्रसंग मानवी जगण्याला नवे काही तरी शिकवून जातात.'

दोन्ही पुस्तकांतून वाचकांना आत्मविश्वास, व्यावहारिक जगात वावरण्यासाठी नवीन ऊर्जा मिळेल, असा विश्वास गोरे यांनी व्यक्त केला. यावेळी वर्षादेवी नाडगोंडे प्रमुख उपस्थित होत्या.

प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते मान्यवरांचे सत्कार झाले. महेश्वरी गोखले यांनी सूत्रसंचालन केले. विभव प्रकाशनतर्फे हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2024
लोकमत



लेखिका विनया गोरे यांच्या मराठी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकाचे प्रकाशन डॉ. ज्ञानेश्वर मुळे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. उपस्थितांत लेखिका विनया गोरे, विभव प्रकाशनच्या वर्षादेवी नाडगोंडे, आदी.

# समग्र मानवी जीवनाशी सुसंवाद : ज्ञानेश्वर मुळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मानवी जीवन, घटना आणि अनेक प्रसंगांची नाळ पुस्तकात जोडली आहे. शब्द सौंदर्य आणि विचार सामर्थ्याची ताकद वाचकांना निश्चितच अंतर्मुख करायला लावणारी आहे, असे प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे माजी सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

विनया गोरे लिखित 'फाइंडिंग माय कोर' या इंग्रजी आणि 'विनया गोरे ते विनया गोर' या मराठी पुस्तकाच्या प्रकाशनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. पेटाळा येथील दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या राम गणेश गडकरी सभागृहात रविवारी कार्यक्रम झाला.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे म्हणाले, गोरे लिखित पुस्तकांत उपमा, उत्प्रेक्षा, रूपकांचा प्रयोग चांगल्या पद्धतीने केला आहे. भाषिक सौंदर्याचा साज चढविल्याने त्यांचे पुस्तक वाचकावर शब्द सौंदर्य आणि विचार सामर्थ्याची मोहिनी घालत अंतर्मुख करते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, दोन्ही पुस्तकांत समृद्ध भाषाशैली आहे. जीवनातील अनेक प्रसंग, घटना, संघर्ष आणि त्यावर केलेली मात वाचकांना खिळवून ठेवणारी आहे.

लेखिका विनया गोरे म्हणाल्या, पुस्तक वाचून वाचकांना निश्चितच सकारात्मक ऊर्जा आणि आनंद मिळेल. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रभाकर भोसले यांचा सत्कार झाला. ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संदेश वाचून दाखविला. विभव प्रकाशनच्या वर्षादेवी नाडगोंडे उपस्थित होत्या. माहेश्वरी गोखले सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्र शुल्कात वाढ

## जाधव : सुधारित शुल्कास अधिकार मंडळाची मान्यता

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्रे आणि इतर सुविधांच्या शुल्कामध्ये वाढ झाली आहे. त्यानुसार पदवी प्रमाणपत्रासाठी आता नियमित शुल्क पाचशे रुपये असणार आहे.

विद्यापीठातील दीक्षांत विभागातर्फे विविध अभ्यासक्रमाचे प्रोव्हिजनल पदवी प्रमाणपत्रे, प्रमाणपत्र पडताळणी आणि साक्षांकित करणे, दुबार पदवी प्रमाणपत्रे, स्पेशल प्रमाणपत्रे, आदी सुविधा दिल्या जातात. या सुविधांसाठी आकारण्यात येणारे शुल्क सुधारित करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार नियमित पदवी प्रमाणपत्रासाठी नियमित शुल्क पाचशे रुपये, विलंब शुल्क सातशे रुपये, अति विलंब शुल्क सतराशे रुपये आकारले जाणार आहे. पोस्टल चार्जेस शंभर रुपये असणार आहेत. तात्काळ पदवी प्रमाणपत्र मागणी शुल्क साडेपाच हजार रुपये, प्रोव्हिजनल सर्टिफिकेटसाठी दोनशे रुपये आणि पदवी प्रमाणपत्र पडताळणीसाठी भारतीय संस्था, कॉलेज अथवा कंपनी असल्यास चारशे, तर परदेशी संस्था, कॉलेज, कंपनीसाठी दोन हजार रुपये आणि एअर मेल चार्जेस अधिक असणार आहेत.

पदवी प्रमाणपत्र दुरुस्तीसाठी चारशे रुपये शुल्क आकारले जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.